# आंतर विद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ अव्वल

**अमरावती/प्रतिनिधी**

उत्तरप्रदेश राज्यातील झाशी येथील बुंदेलखंड विद्यापीठात संपन्न झालेल्या मध्य विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. तर दुस-या क्रमांकावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राहीला. युवा महोत्सव चमूचे कुलगुरू डॉ. मोहन खेडकर यांनी कुलगुरू कार्यालयात अभिनंदन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके, परीक्षा नियंत्रक डॉ. जे.डी. वडते, वित्त व लेखाधिकारी डॉ. शशीकांत आस्वले, चमू व्यवस्थापक डॉ. मोना चिमोट. डॉ. निलेश नलोडे व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

## बुंदेलखंड विद्यापीठ झाशी (उ.प्र.) येथे संपन्न झाली स्पर्धा

मध्य विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव २०१५-१६ मध्ये विद्यापीठ संघाने शास्त्रीय वाद्य संगीत (तालवाद्य) मध्ये तृतीय, शास्त्रीय वाद्यसंगीत स्वरवाद्य मध्ये द्वितीय, भारतीय लाईट व्होकल मध्ये द्वितीय, वेस्टर्न व्होकल (सोलो) मध्ये तृतीय, भारतीय समुहगान मध्ये प्रथम, पाश्चिमात्य समुहगानमध्ये द्वितीय, फोक ऑर्केस्ट्रॉमध्ये प्रथम, शास्त्रीय नृत्यामध्ये तृतीय, फोल्क/ ट्रायबल डॉन्समध्ये प्रथम, वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम, स्कीट स्पर्धेत द्वितीय, एकांकिका स्पर्धेमध्ये द्वितीय, स्पॉट फोटोग्रॉफी स्पर्धेत तृतीय स्थान प्राप्त केले. स्पर्धकांना सांस्कृतिक समन्वयक प्रा. एम.टी. देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

स्पर्धेनिहाय संगीत स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने प्रथम, नृत्य स्पर्धेत राणी दुर्गावती विद्यापीठ, जबलपूर, लिटेरॅरी मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ, थेअटर स्पर्धेत देवी अहिल्याबाई विङा विद्यालय, इंदोर, फाईन आर्ट्स स्पर्धेत इंदिरा कला संगीत विङा विद्यालय, खाकागढ, छत्तीसगड यांनी अव्वलस्थान मिळविले, मध्य विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव फाईन आर्ट स्पर्धेमध्ये कु. गायत्री वि. ठाकरे, एस.एस.के. आर.आय. महाविद्यालय, कारंजा लाड, श्री सुरज लकडे, श्री. शिवाजी महाविद्यालय, अकोट, वादविवाद/वक्तृत्व स्पर्धेत श्री भिमकिर्ती बारसे, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती, श्री अनिरूद्ध महाजन, श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती, वेस्टर्न सोलो स्पर्धेत कु. पुर्वा जामनिक, सिपना अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती, शास्त्रिय गायन स्पर्धेत श्री शुभम एस. पांडे, सुगम संगीत स्पर्धेत कु. वाचस्पती चंदेल, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महा. अकोला, शास्त्रिय वाद्य संगीत तालवाद्य स्पर्धेत श्री सौरभ देवधर, बाबाजी दाते महाविद्यालय, यवतमाळ, स्वरवाद्य स्पर्धेत श्री. अजित खंडारे, श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळ, समुहगान (भारतीय) स्पर्धेत कु. प्रणिता वाकोडे, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती, कु. अंकिता पिहुलकर, डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टी. ऑफ टेक्ना. ॲण्ड रिसर्च, अमरावती, कु. वाचस्पती चंदेल, श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महा. अकोला, कु. अंबिका ठाकरे, श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.

नृत्य प्रकारात शास्त्रीय नृत्य स्पर्धेत कु. कृतिका आर. काणे, प्रो. राम मेघे अभि. व व्यवस्थापन महा. बडनेरा, रेल्वे, समुहनृत्य स्पर्धेत कु. कृतिका आर. काणे, प्रो. राम मेघे अभि. व व्यवस्थापन महाविद्यालय, बडनेरा रेल्वे, कु. प्राची ढोके, कला, वाणिज्य व विज्ञान महा. किरण नगर, अमरावती, , कु. अङिानी गुंबळे, श्री. ब्राजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती, कु. पुनम केकन, श्रीमती राधादेवी गोयनका महिला महा. अकोला, कु. मिताली चव्हाण, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती, कु. मेघना गायधरे, भारतीय महाविद्यालय, अमरावती, कु. नेहा डोंगरकर, प्रो. राम मेघे अभि. व व्यवस्थापन महाविद्यालय, बडनेरा रेल्वे, कु. राणी गणविर सिपना अभियांत्रिकी महा. अमरावती, कु. दिपाली निर्वाण, विद्याभारती महाविद्यालय, अमरावती. पाश्चिमात्य समुहगान स्पर्धेत कु. नेहा सावके, श्री शिवाजी विज्ञान महा. अमरावती, कु. अर्चना वानखडे, जी.एच. रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालय, फोक ऑर्केस्टॉ स्पर्धेत श्री. शुभम उदावंत श्रीमती नानकीबाई वाधवाणी महाविद्यालय, यवतमाळ, कु. विजया खंडारे, महिला महाविद्यालय, अमरावती, श्री विशाल पांडे, महात्मा ज्योतिबा फुले महा. अमरावती, एकांकिका/स्किट/माईम स्पर्धेत्त श्री दिपक नांदगांवकर, श्री. शिवाजी कला व वाणिज्य महा. अमरावती, कु. आरती धनुषकर, भारतीय महाविद्यालय, अमरावती, श्री. अंकुश गवई, श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती, श्री गित बुरंगे, भारतीय महा. अमरावती, कु. अङिानी लांजेवार, डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टी. ऑफ टेक्ना. ॲण्ड रिसर्च, अमरावती, श्री पवन पवार, कु. प्राची खेडेकर, श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांचा समावेश आहे.

साथीदारामध्ये श्री चंद्रकांत शिंदे, श्री. प्रशांत ठाकरे, श्री. प्रकाश मेश्राम, श्री अभिजित भावे, श्री. अवधुत पाटील, ॲड. सतिश उपाध्याय, अमरावती यांचा समावेश आहे. तर चमू व्यवस्थापक डॉ.मोना चिमोटे, भारतीय महा. अमरावती, प्रा. निखिलेश नलोडे, श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला. महा. यवतमाळ यांचा समावेश होता. विद्यापीठाच्या युवा महोत्सव चमुने मध्य विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धेत प्रथम स्थान मिळविल्याबद्दल कुलगुरू डॉ. मोहन खेडकर, प्र-कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, सांस्कृतिक समन्वयक प्रा. एम.टी. देशमुख, शारीरिक शिक्षण व रंजन मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असनारे यांनी सहभागी स्पर्धेक विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून अखिल भारतीय युवा महोत्सव स्पर्धेत उत्तम कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्यात.

जनमाध्यम दि० 27/11/15